महाराष्ट्र शासन
सहायक आयुक्त,समाज कल्याण, कोल्हापूर.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारेमाळ, कोल्हापूर.
दु. क्र. ०२३१-२६५१३१८
Email :- acswokolhapur@gmail.com
जा.क्र. सआसकको/उ.तो.का.बै./बैठक/इतिवृत्त/२०२१-२२/४१९०

दिनांक- ०१.११.२०२१.
१०/११/२१

## राज्यातील उसतोड कामगारांना ओळखपत्र देणेबाबत जिल्हास्तरीय समिती, कोल्हापूर बैठक गुरुवार दिनांक २८ ऑक्टोंबर २०२१ रोजी दुपारी २.३० वाजता संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी यांचे दालनात दि.२८.१०.२०२१ रोजी दुपारी ०२.३० वा. संपन्न झाली. सदर सभेस खालील शासकीय सदस्य तसेच निमंत्रीत उपस्थित होते.

| अ. क्र. | नांव व हुद्दा | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | मा. श्री. राहूल रेखावार . जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर. | अध्यक्ष |
| २. | जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३. | जिल्हा महीला व बालविकास अधिकारी, कोल्हापूर. यांचे प्रतिनिधी श्री.सि.डी.तेली | सदस्य |
| ४. | उपमुख्य कार्याकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | जिल्हा उपनिबंधक सहकार विभाग | सदस्य |
| ६. | मा.प्रादेशिक सहसंचालक (साखर) किंवा त्यांचा प्रतिनिधी | निमंत्रित |
| ७. | श्री.आनंद गजगेश्वर गट विकास अधिकारी पं.स.आजरा | निमंत्रित |
| ८. | श्री.शंकर कवितके गट विकास अधिकारी पं.स.शिरोळ | निमंत्रित |
| ९. | डॉ.एस.ए.मोकाशी गट विकास अधिकारी पं.स.हातकणंगले | निमंत्रित |
| १०. | श्रीचंद्रकांत बोडरे गट विकास अधिकारी पं.स.चंदगड | निमंत्रित |
| ११. | श्री.शरद मगर गट विकास अधिकारी पं.स.गडहिंग्लज | निमंत्रित |
| १२. | श्री.तुलशीदास शिंदे गट विकास अधिकारी पं.स.पन्हाळा | निमंत्रित |
| १३. | श्रीम.माधुरी परीट गट विकास अधिकारी पं.स.गगनबावडा | निमंत्रित |
| १४ | श्री.सुशिल संसारे गट विकास अधिकारी पं.स.कागल | निमंत्रित |
| १५ | श्री.संदीप भंडारे गट विकास अधिकारी पं.स.राधानगरी | निमंत्रित |
| १६. | श्री.जयवंत उगले गट विकास अधिकारी पं.स.करवीर | निमंत्रित |
| १७ | श्री.अनिल वाघमारे गट विकास अधिकारी पं.स.शाहुवाडी | निमंत्रित |
| १८. | श्रीम.एस.जे.पोवार गट विकास अधिकारी पं.स.भुदरगड | निमंत्रित |
| १९. | श्री. विशाल लोंढे, सहायक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर. | सदस्य सचिव |

सहायक आयुक्त, समाज कल्याण, तथा सदस्य सचिव, यांनी राज्यातील उसतोड कामगारांना ओळखपत्र देणेबाबत जिल्हास्तरीय समिती, कोल्हापूर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली. मागील इतिवृत्त वाचून कायम करणेत आले. सभेमधील झालेली चर्चा व निर्णय पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र | विषय | चर्चा व मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या सूचना | कार्यवाही करावयचा विभाग |
|---|---|---|---|
| १. | उसतोड कामगारांना ओळखपत्र देणेबाबतच्या शासन निर्णयावर चर्चा करणे | मा.अध्यक्ष महोदय यांच्या राज्यातील उसतोड कामगारांना ओळखपत्र देण्याबाबतच्या दि.२१.०९.२०२१ रोजीच्या शासन निर्णयामध्ये उसतोड कामगारांबाबतच्या व्याख्यांचे वाचन करून त्या गावात वास्तव्यास असलेल्या उसतोड कामगारांना ओळखपत्र देणेची कार्यवाही करावी लागेल अशी स्पष्टता करून घेणेत आली. तसेच मागील तीन वर्षापासून सदर व्यक्ती उसतोड करत असावा व मागील ५ वर्षामध्ये म्हणजे २०१७-१८ पर्यंत सदर व्यक्तीने उसतोड केली असल्यास त्यास ओळखपत्र अदा करता येईल अशी स्पष्टता मा.अध्यक्ष महोदय यांनी समितीच्या अनुमोदनाव्दारे ठरविली. तसेच शासन निर्णयान्वये सदर व्यक्तींनी ५ वर्षापासून सदर कामकाज करत असलेबाबत स्वयंस्पष्ट घोषणापत्र देणे गरजेचे असलेचे समितीमध्ये ठरविण्यात आले. | गट विकास अधिकारी (सर्व)<br><br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जि.प.कोल्हापूर. |
| २. | उसतोड कामगारांना ओळखपत्र देणेबाबतच्या कार्यवाहीचा आढावा | याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी राज्यातील उसतोड कामगारांची माहितीबाबत ब कार्यवाहीबाबत संबंधित यंत्रणांना विचारणा केली असता मा.प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर यांनी कामगार उसतोडीसाठी बाहेरगावी गेलेने व कोल्हापूराती ६-७ कारखाने सुरु झालेने सर्व साखर कारखानांची माहिती १५ दिवसांमध्ये एकत्रित करता येईल असे सांगितले.<br>तसेच गट विकास अधिकारी यांनी कारखान्यामधील स्लीप बॉय याचेकडे सर्व उसतोड कामगारांच्या नोंदी मिळू शकतात याबाबत माहिती दिली . यावर मा.अध्यक्ष यांनी सदर माहिती मिळवून सद्यस्थितीत गटविकास अधिकारी यांनी शासन निर्णयातील अटींप्रमाणे व आदेशाप्रमाणे ग्रामसेवक यांना पत्रव्दारे करावयाच्या कार्यवाहीबाबत अवगत करावे. | मा.प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर.<br><br>गट विकास अधिकारी (सर्व).<br><br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जि.प.कोल्हापूर. |
| ३. | सद्यस्थितीत झालेल्या कार्यवाहीचा आढावा | मा.अध्यक्ष यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग यांना आजरोजीपर्यंत किती अर्ज भरण्यात आले याबाबत विचारणा केली असता उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आजरोजीपर्यंत ७०० अर्ज वाटप केलेचे सांगितले. याबाबत सर्व गटविकास अधिकारी यांचा आढावा घेवून उसतोडीचा हंगाम सुरू असताना जितके कामगार | उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गावांमध्ये उपलब्ध होतील त्याप्रमाणे अर्ज भरून घेणेचे सुचित केले. कारखान्यांचा गळपाचा हंगाम संपताच उर्वरित कामगारांची नोंदणी पुर्ण होवून त्यांना ओळखपत्र वाटप करण्याची प्रकिया पुर्ण करून घेणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सुचना दिल्या आहेत. | ( जि.प.)<br><br>गट विकास अधिकारी (सर्व). |

वरीलप्रमाणे विषयांवर चर्चा करणेत आली.मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने बैठक समाप्त करण्यात आली.

**विशाल लोंढे**
**सदस्य सचिव,**
**उसतोड कामगारांना ओळखपत्र देणेबाबत जिल्हास्तरीय समिती**
**तथा सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, कोल्हापूर.**

**राहुल रेखावार(भा.प्र.से.)**
**अध्यक्ष,**
**उसतोड कामगारांना ओळखपत्र देणेबाबत जिल्हास्तरीय समिती**
**तथा जिल्हाधिकारी कोल्हापूर.**

**प्रत :-**

१.मा. आयुक्त, समाज कल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे, यांना सविनय सादर.

२.प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण पुणे विभाग पुणे, यांना माहितीस्तव.

---

जा.क्र.सआसकको/रा.ऊ.का.ओ/बैठक/इतिवृत्त/४१९० दि. १०/११/२०२१

**प्रति,**

---------------

---------------

राज्यातील उसतोड कामगारांना ओळखपत्र देणेबाबत जिल्हास्तरीय समिती, कोल्हापूर बैठक गुरुवार दिनांक २८ ऑक्टोंबर २०२१ रोजी दुपारी २.३० वाजता संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त आपणास पाठविण्यात येत असून आपणाशी निगडीत मुद्दा क्र.----------------बाबत उचित कार्यवाही करून या कार्यालयास अवगत करावे, ही विनंती.

**विशाल लोंढे**
**सदस्य सचिव,**
**उसतोड कामगारांना ओळखपत्र देणेबाबत जिल्हास्तरीय समिती**
**तथा सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, कोल्हापूर.**